नि.फौ.ख.क्र.३७१/२०२५
सरकार –वि– शेख अहमद
<u>निशाणी क्रमांक ०८</u>

**<u>सरकार तर्फे साक्षदार क्रमांक ०१ ची साक्ष शपथेवर सुरू</u>** :–

माझे नाव :– शेख बुढण शेख फत्तु
वय :– ४८ वर्ष, व्यवसाय :– रिक्षाचालक,
राहणार :– शेगांव, ता.शेगांव, जि. बूलडाणा.

**<u>सरतपासणी : सरकारी वकील श्रीमती ए.के.शाह यांच्यामार्फत सुरू</u>** :–

१. पोलीसांनी मला पंचनामा करण्यासाठी कोठेही बोलाविले नाही. माझेसमक्ष कोणतीही कार्यवाही करण्यात आली नाही व पंचनामा करण्यात आला नाही. पोलीसांनी माझी सही घेतली नाही. पोलीसांनी माझेसमक्ष परेश विसपुते यांचेकडुन काहीही जप्त केले नाही. मी परेश विसपुते यांना ओळखत नाही. आता मला जप्ती पंचनामा व जप्ती पत्रक दाखविले. त्यावर माझ्या सहया आहे. त्यातील मजकुर मला माहित नाही. त्यास सहिपुरता अनुक्रमे **नि.क्र.०९ व १०** देण्यात येते.

**(सदर साक्षीदार अभियोग पक्षाला सहकार्य करत नसल्याने सरकारी अभियोक्त्याच्या तोंडी विनंतीवरुन या साक्षदाराला उलटतपासणी स्वरुपात प्रश्न विचारण्याची परवाणगी देण्यात आली.)**

२. हे म्हणने खरे नाही की दिनांक ०२.०५.२०२५ रोजी पोलीसांनी मला शहर पोलीस स्टेशन येथे सकाळी ११.३० वाजेच्या दरम्यान बोलाविले होते व त्यावेळी दुसरे पंच दर्शन तायडे हे माझेसोबत हजर होते. हे म्हणने खरे नाही की तेथे परेश विसपुते हे सुध्दा हजर होते. हे म्हणने खरे नाही की पोलीसांनी माझेसमक्ष सोळा सोन्याचे वस्तु अंदाजे किंमत १८८४०/– रुपयाचा मुददेमाल जप्त केला, त्याचा जप्ती पंचनामा तयार केला, मला वाचुन दाखविला व मी त्यावर सही केली. मी आरोपीला ओळखत नाही. हे म्हणने खरे नाही की पोलीसांनी माझेसमक्ष सोन्याचा मुददेमाल जप्त केला नाही. हे म्हणने खरे नाही की मी आरोपीला ओळखतो व त्याला वाचविण्यासाठी खोटी साक्ष देत आहे.

**<u>उलटतपास आरोपीतर्फे श्री.सी.बी.देशमुख वकील साहेब यांनी नाकारला.</u>**

**सा.वा.दा.ब.अ.क.केले.**

**माझे समक्ष,**

MADHURI KEWAL GOTE

Digitally signed by MADHURI KEWAL GOTE
Date: 2026.03.02 12:19:24 +0530

**( एम. के. गोटे )**
न्यायदंडाधिकारी, प्रथम श्रेणी,
शेगाव. (कोर्ट नं.२)
**दिनांक – ०२.०३.२०२६.**

**( एम. के. गोटे )**
न्यायदंडाधिकारी, प्रथम श्रेणी,
शेगाव. (कोर्ट नं.२)
**दिनांक – ०२.०३.२०२६**